# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र : रानिआ/२०१५/प्र.क्र. ५ /सं.क,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६/०१/२०१७

प्रति,
**जिल्हाधिकारी,**
रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ , नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली.
**आयुक्त,**
बृहन्मुंबई, पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूर, सोलापूर,
अमरावती, उल्हासनगर व अकोला महानगरपालिका.

विषय :- कॉप मोबाईल ॲप ची अमंलबजावणी करण्याबाबत...

महोदय/महोदया,

निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला असून, आचारसंहिता अमंलबजावणीची सुरुवात झालेली आहे. आपल्याकडून आचारसंहिता अमंलबजावणीकरिता विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असेल व त्यात कर्मचारी नेमण्यात आले असतील. त्याचप्रमाणे विविध विभागाचे अधिकाऱ्यांचा समावेश असलेली द्विस्तरीय नियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेल्या आहेत (जिल्हास्तरीय/मनपा स्तरीय आणि निवडणूक निर्णय अधिकारी स्तरीय).

निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे हे भारतीय राज्य घटनेचा महादेश आहे. या महादेशाची अमंलबजावणी करण्याकरिता सामान्य जनतेला आचारसंहिता भंगाच्या तक्रारी दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक

आहे. तसेच अशा तक्रारींवर तात्काळ व परिणामकारक कारवाई होणे देखील तितकेच आवश्यक आहे.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की,

१. तक्रारदाराचे नाव गोपनिय राहत नसल्याने आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करण्यास नागरिक पुढे येत नाहीत.

२. सदर घटना घडल्यापासून तक्रार प्राप्त होईपर्यंत व तक्रार प्राप्त झाल्यापासून त्यावर कारवाई होईपर्यंत लागणाऱ्या कालावधीमुळे परिणामकारक कारवाई होणे शक्य होत नाही.

यावरील कमतरता दूर करण्यासाठी व आचारसंहितेची परिणामकारक अमंलबजावणी होण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने कॉप हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपमध्ये अत्यंत सुलभरित्या, स्वत:चे नाव गोपनिय ठेवून, आचारसंहिता भंग होत असणाऱ्या ठिकाणावरुन जनता तक्रार नोंदवू शकते. तसेच तक्रार प्राप्त होताच या ॲप्लीकेशनमार्फत घटनेपासून २ कि.मि. परिसरात हजर असणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना या तक्रारीचा तपशिल मोबाईलवर प्राप्त होईल आणि ते लागलीच कारवाई करु शकतील.

तरी आपल्या कार्यालयाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

१. सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कॉप (Citizens On Patrol-COP) हे ॲप डाऊनलोड, Install व Map my location (कार्यालयातून/कामाच्या ठिकाणावरुन) करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

२. वरील सर्व अधिकाऱ्यांची यादी आयोगास avinash.sanas@nic.in या ईमेल आयडीवर पाठवावी.

३. जनतेला ॲपबद्दल माहिती मिळण्याकरिता त्यास प्रसिध्दी दयावी (याबाबतचे क्रिएटिव्ह, व्हिडीओ, PPT आयोगाकडून पुरविण्यात येतील)

४. प्राप्त तक्रारींवर तात्काळ कारवाई होण्याच्या दृष्टीकोणातून उपाययोजना ठेवावी.

५. जे अधिकारी/कर्मचारी घटनास्थळी जातील त्यांनी घटनास्थळाचा / कारवाईचा फोटो Action taken report मध्ये अपलोड करावा.

६. आलेल्या तक्रारी तसेच केलेल्या कारवाईचा दर आठवडयाला अहवाल पाठवावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला

(अविनाश सणस)
प्रभारी उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत :- मराठी व इंग्रजीमध्ये सदर मोबाईल ॲप्लीकेशन अमंलबजावणीची कार्यपध्दती.

## 'COP- Citizens on Patrol' हे मोबाईल ॲप वापरण्याची कार्यपध्दती

**<u>अधिकाऱ्यांनी करावयाची पूर्वतयारी :-</u>**

१. आचारसंहिता भंगासंबंधात तक्रारी करण्याची सुविधा या मोबाईल ॲपद्वारे पुरविण्यात आली आहे. सर्वप्रथम अधिकारी /कर्मचाऱ्यांची खालीलप्रमाणे यादी तयार करावी. या यादीत आचारसंहिता भंगाकरिता नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी, नगरपरिषद हद्दीतील पोलीस ठाण्याचे अधिकारी/कर्मचारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी/कर्मचारी, आयकर विभागाचे अधिकारी/कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, मुख्याधिकारी, उप मुख्यधिकारी, निरीक्षक, स्टॅटिक सर्व्हेलन्स टिम, भरारी पथक, व्हिडीओ सर्व्हेलन्स टिम, तक्रार निवारण कक्ष इत्यादि यांचा समावेश असावा.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे/कर्मचाऱ्याचे नाव | पद | भ्रमणध्वनी क्र. | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

२. यासाठी प्रथम खालील अधिकाऱ्यांना हे ॲप डाऊनलोड करुन Install करावे लागेल. खालील लिंकवरुन डाऊनलोड करावे.

Go on link https://play.google.com/store/apps/details?id=com.cramat.cop and download. OR Go to Play Store and search for 'COP- Citizens on Patrol' or 'Webrosoft' and download.

३. यानंतर सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ॲप (Registration) नोंदणी करावे. सदरची नोंदणी ही त्यांच्या **<u>कार्यालयात अगर कामाच्या ठिकाणी हजर राहूनच</u>** नोंदणी करणे आवश्यक आहे.

४. मुद्दा क्र.१ मधील यादी आयोगास avinash.sanas@nic.in व pranali.lnjd7@gmail.com या ई-मेलवर पाठवावा. सदर यादी प्राप्त झाल्यानंतर या अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना आचारसंहिता नियंत्रणाकरिता ॲप्लीकेशनमध्ये मार्क करण्यात येईल.

<u>आचारसंहितेच्या कालावधी दरम्यान</u>

५. आचारसंहिता कालावधीपूर्वी सदर ॲप व त्याच्या सुविधेचा जास्तीत जास्त प्रचार करावा, जेणेकरुन जनजागृती होऊन या ॲपचा मोठया प्रमाणात वापर होऊ शकेल.

६. नागरीक हे ॲप डाऊनलोड करुन, नोंदणी करुन त्याद्वारे आचारसंहिता भंगाबाबत तक्रार नोंदवू शकतील. या तक्रारीत होणाऱ्या भंगाचा छायाचित्र, भंगाच्या स्थळाचे GPS Location, भंगाचा प्रकार व तपशील प्राप्त होतो.

७. ही प्राप्त झालेली तक्रार सदर स्थळाच्या GPS Location च्या २ किलोमिटर परिक्षेत्रात नोंदणीकृत अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ तक्रारीची माहिती एसएमएस व ई-मेलद्वारे प्राप्त होणार.

८. अशी तक्रार प्राप्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी तात्काळ सदर आचारसंहिता भंगाच्या ठिकाणी पोहचावे व संबंधितांवर कारवाई करावी. सदर कारवाईचे छायाचित्र तसेच तपशील ॲपद्वारे अपलोड करावे.

नोट :- सदरचे ॲप हे मुख्यत: Response time कमी करुन परिणामकारक आचारसंहिता अमंलबजावणी करण्याकरिता हे ॲप तयार करण्यात आले आहे. उदा. पैसे वाटप, भेट वस्तु वाटप, दारु वाटप याबाबत तक्रार येण्यास लागणारा वेळ व तक्रारीवर कारवाई करण्यास लागणारा वेळ यामुळे अशा भंगावर कारवाई करण्यास नेहमी अपयश आलेले आहे. तसेच तक्रारदाराचे नाव व तपशील याची गोपनियता न राहिल्याने बरेच प्रमाणिक नागरीक भिती पोटी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत.

या ॲपद्वारे तक्रारदाराची पूर्ण गोपनियता बाळगण्यात येते. तसेच घटनास्थळावरुन तक्रार नोंदविल्याने ती लागलीच अधिकाऱ्यांकडे पोहचल्याने त्यावर तात्काळ कारवाई होऊ शकेल, कारण Response time हा Instant (त्वरित) असल्याने परिणामकारक कारवाई होण्याची अपेक्षा आहे.

## Process Flow of Cops

1. Finalise the list Officers/staff related to Election, Model code implementation, Election Monitoring Committee etc. Please note that these Officers /staff should include persons from various departments like Police, Excise, Banks, Income Tax, Revenue, etc.
2. All these Officers/staff to Download the app COP-Citizens on Patrol

   Go on link https://play.google.com/store/apps/details?id=com.cramat.cop and download. OR

   Go to Play Store and search for 'COP- Citizens on Patrol' and download.
3. All these Officers/staff to Register themselves on app from their office or work place.

   Follow the instructions and register the app from office location or work place only. The reason for location is capture of latitude- longitude via GPS location service so that later all complaints can be instantly notified within 2 km radius to all the registered officers / staff. Kindly follow the instructions given on PPT and Video herewith.
4. List of All the registered Officers/staff to be sent to SEC in the given format.

| Sr.No. | Officer / Employer Name | Designation | Mobile NO. | E-mail ID |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

5. Publicity of app. throughout the local body. The creative will be provided by SEC through Google drive. These creative should be printed in hoardings, banners, posters etc. throughout the Corporation area or Districts. The jingles and videos be publicized in proper media.
6. Videos posted on Youtube be disseminated via link on Website and other media.
7. App would be Open for public to lodge complaint during the period from declaration of election programme till the day of result

8. Complaint will be automatically forwarded to all officers within 2 km radius of the complaint.
9. It is expected that officer should instantly respond. Visit the site via navigation. Verify the complaint truth. Take action on illegal or unethical activities that violate code of conduct.
10. Reporting of the action taken. Click the photo of action taken. Upload report.
11. Intimation of Action to complainant. Complainant name is kept secret. Report of action gets automatically reported to complainant.
12. Various reports to be generated- MIS at admin level

**Download & Intall 'COP' by Officers and by Citizens**

https://play.google.com/store/apps/details?id=com.cramat.cop

**Registration by Officers**

Officers to Regsiter from Office or Work Place ONLY

Citizens can register from anywhere

**Officers to map their Location**

Officers to map their location from their office or work place

**Officer details to SEC**

All registered officers details be mailed to SEC for marking them on the app

**Complaint by Citizens**

Citizens can instantly lodge comlaint from the site itself, where code of conduct is being violated. The complaint has Geo tagged photo, category of violation and description.

**Instant Response by Officers**

Registered Officers within the radius of 2 km will get instant notification with details of complaint (without details of complainant) and GPS with navigation, to enable him reach immedieatly to spot.

**Immedieate Action Taken Report**

Officer first reaching spot to take action, click photo of spot with action if any and enter report in the app.

**Intimation of Action to Complainant**

As the officers uploads photo and report of Action Taken, it is informed to the complainant.

Pr